# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** लातूर **P.S.(ठाणे):** एम.आई.डी.सी. लातुर

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0450 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ):29/05/2025 20:22

2.

| **S.No.** (अ.क्र.) | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): गुरूवार **Date From** (दिनांक पासून): 15/05/2025
**Time Period** (कालावधी): पहर 4 **Date To** ( दिनांक पर्यंत): 15/05/2025
**Time From** (वेळेपासून): 12:27 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 12:27 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
**Date** (दिनांक ): 29/05/2025 **Time** (वेळ): 19:45 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):
**Entry No.** (नोंद क्र.): 026
**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 29/05/2025 20:08 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
पश्चिम, 00.10 किमी **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): पोस्टे एमआयडीसी,लातुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):
**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): मुकेश वाल्मिक लहाने

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 2000

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | बाभळगाव,लातुर ,एम.आई.डी.सी. लातुर,लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | बाभळगाव,लातुर ,एम.आई.डी.सी. लातुर,लातूर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7420995200

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रशांतसिंह रघुनाथसिंह रजपुत | | | 1. पोस्टे एमआयडीसी,लातुर ,एम. आई.डी.सी. लातुर,लातूर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी मुकेश वाल्मिक लहाने वय 25 वर्षे, व्यवसाय व्यापार, रा. बाभळगाव, लातुर मो.नं. 7420995200. असा असुन मी वरील ठिकाणी आई, वडील व भाउ असे राहणेस असुन मी गुत्तेदारी करून व पानटपरी चालवुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. समक्ष फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन मी दिनांक 13/05/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर चे पोलीस उपअधीक्षक बर्गे साहेब यांना त्यांचे कार्यालयात जावून भेट घेवून एका लोकसेवका विरुध्द लाच मागणीची माझी तक्रार असल्याचे तोंडी तक्रार सांगितली. त्यांनी मला दिनांक 15/05/2025 रोजी सकाळी 10.00 ला.प्र.वि. कार्यालय लातूर येथे सापळा कार्यवाही करण्याचे अनुशंगाने येण्यास सांगीतले.त्याप्रमाणे मी दिनांक 15/05/2025 रोजी सकाळी 10.00 वा. सुमारास वरील प्रमाणे सं◌ागितलेल्या ठिकाणी हजर आलो असता तेथे पोलीस उपअधीक्षक बर्गे साहेब व पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब हे ला.प्र.वि. कार्यालय लातूर येथे दोन षासकीय पंच व कर्मचा-यासह हजर होते. त्यांनी मला सापळा पथकातील सदस्य व पंचांची ओळख करून देवुन माझे नांव गांव विचारले असता मी त्यांना माझे नाव वरीलप्रमाणे सांगुन माझी तोंडी तक्रार सांगुन सविस्तर लेखी तक्रार दिली, ती खालील प्रमाणे."मी बाभळगाव, ता. जि. लातुर येथील रहीवाशी असून गुत्तेदारी व छत्रपती चौकात सरकार नावाची पानटपरी चालवुन कुटं◌ुबाचा उदरनिर्वाह करतो. दिनांक 06/04/2025 रोजी लातुर येथील क्राईम बॅ◌्रंच पथकाने अभिशेक गुरुनाथ गिते वय 19 वर्शे रा पषुपतीनाथ नगर, लातुर यांना त्यांचे गाडीत गुटखा विक्रीसाठी नेत असताना पकडुन त्यांचेवर एमआयडीसी पोलीस ठाणे येथे गुरनं 272/2025 भारतीय न्याय संहिता,2023 चे कलम 123,223,274,275,3(5) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्हयात आरोपी गिते यांनी सदर गुन्हयात माझे नाव घेतल्याने मला देखील आरोपी करण्यात आले आहे व मला फरार घोशित करण्यात आले आहे. मी सदर गुन्हयात अटकपुर्व जामीन मिळणेकामी लातुर सेषन कोर्टात अर्ज केला असता माझा जामीन अर्ज नामंजुर करण्यात आला आहे. त्यामुळे मी हाय कोर्ट, औरंगाबाद येथे अटकपुर्व जामीनसाठी अर्ज क्रं 729/25 अन्वये अर्ज केला असता मला सदर प्रकरणांत अंतरीम जामीन मंजुर झाला असुन मला सदर प्रकरणांत नियमित जामीन करीता पुढील तारीख 16/06/2025 अषी देण्यात आली आहे. सदर प्रकरणामध्ये माझे बाजुने हायकोर्टात रिपोर्ट देण्यासाठी व गुन्हयात मदत करणेसाठी तसेच हजेरी कमी करण्यासाठी मला सदर गुन्हयाचे तपासी अधिकारी पीएसआय रजपुत साहेब यांनी 25000/- रु ची लाचेची मागणी केली आहे. त्यांनी मागणी केलेली 25,000/- रुपये लाचेची रक्कम देण्याची माझी इच्छा नसुन मी त्यांना कुठलीही थकबाकी देणे नाही. मी आज रोजी पीएसआय रजपुत साहेबांची यांची भेट घेवुन माझे वरील नमूद कामासंदर्भाने विचारणा करणार असुन पुन्हा त्यांनी स्वतः अगर इतरामार्फत लाचेची मागणी केल्यास संबंधीतांवर भ्र. प्र.का. अन्वये कार्यवाही करण्यात यावी. तसेच माझेषी त्यांचा कुठल्याही प्रकारचा आर्थीक तथा देवाण घेवाणीचा व्यवहार झालेला नाही, बाकी नाही.'' अषा आषयाची लेखी तक्रार दिली. मी दिलेली तक्रारीवर पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब व पंचांनी वाचुन पाहुन त्यावर स्वाक्ष-या केल्या आहेत. पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांनी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने एआयडीसी पोलीस ठाण्याचे पीएसआय रजपुत साहेब यांनी मला माझ्या वर नमुद केलेल्या कामासाठी लाचेची मागणी केली आहे अगर कसे? यांची पडताळणी करुन ती ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवुन त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत मला व पंचांना माहिती सांगुन, ते कोरे असल्याचे खात्री करुन देवुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये सिलबंद पाकीटातील नविन कोरे मेमरीकार्ड टाकुन माझे व दोन्ही पंच तसेच पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत करुन पडताळणी करण्याचे ठरवुन सापळा कार्यवाहीबाबत मला व पंचांना तसेच सापळा पथकातील सदस्य यांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही सर्वजण सदर ठिकाणाहुन खाजगी वाहनाने एमआयडीसी पोलीस ठाणे परिसरात आडबाजूस थांबून राहीलो. त्यानंतर पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांनी मला योग्य त्या सुचना देवून पोकॉ/1488 गजानन जाधव यांचे मार्फतीने 11◌:47 वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटन चालु करुन माझ्या गळयात आडकावुन एमआयडीसी पोलीस

ठाण्यात जाण्यास सांगितले मी व पंच क्रमांक 1 लव्हरे असे एमआयडीसी पोलीस ठाण्यातील पीएसआय रजपुत साहेब हे बसत असलेल्या रूममध्ये गेलो असता तिथे पीएसआय रजपुत साहेब हे शासकीय गणवेषात होते. मी पंचास हेच पीएसआय रजपुत असल्याचे ईषा-याने सांगुन त्यांची पंचासमक्ष भेट घेतली असता त्यांनी माझे वरील नमुद कामाच्या अनुशंगाने पंचासमक्ष समोरासमोर चर्चा केली. चर्चे दरम्यान मी पीएसआय रजपुत यांना साहेब तेवढं जामीनच कागद कोर्टात पाठवा.. आणि तारखासुध्दा कमी करा... सहकार्य करा साहेब असे म्हणालो असता पीएसआय रजपुत यांनी मी काय नाही म्हणालो काय ? सहकार्य करतो... नाही म्हणलो का मी... तुझा फोन सुध्दा घेइना.. असे म्हणून कर तुझ्या हिशेबान कर... असे म्हणून स्वतःचे मोबाईलवर 25,000/-रूपये असे टाईप करून मला पंचासमक्ष दाखवून... मला जायचाय लवकर कर... किती वेळ लागतय तूला... असे म्हणाले त्यावर मी म्हणालो की, बरं वीस हजार करा... काहीतरी काढा की मधी पर्याय... त्यावर पीएसआय रजपुत मला म्हणाले की, ते मला जमणार नाही... राहुदे काही करू नको... मग मला काही करू नको... त्यावर मी त्यांना म्हणालो की बर आलो साहेब थांबा... इथच आहेत का कुठं येवू... त्यावर पीएसआय रजपुत यांनी लवकर ये पटषीरी...त्या मी निघालो... असे म्हणून स्पश्टपणे 25,000/-रू. लाचेची मागणी करून लाचेची रक्कम घेवून येण्यास सांगीतले म्हणून मी व पंच क्रमांक 1 लव्हरे असे एमआयडीसी पोलीस ठाण्यातुन निघून बाहेर बाजूस थांबविण्यात आलेल्या सापळा पथकाच्या वाहनाजवळ 12ः34 वाजताचे सुमारास आलो असता पोकॉ/1488 गजानन जाधव यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर घेवून बंद केले. पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांनी माझ्या समक्ष पंच क्रमांक 1 लव्हरे यांना लाचेची मागणीच्या अनुशंगाने माझ्यात व पीएसआय रजपुत यांच्यात काय बोलने झाले याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 लव्हरे यांनी मी वर नमुद केल्या प्रमाणे हकीकत सांगितली. आम्ही सर्वानी व्हॉईस रेकॉर्डर हाताळणारे पोलीस कर्मचारी जाधव यांचे मार्फतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्यात व पीएसआय रजपुत यांच्यात झालेले संभाशण ऐकुन ते मी व पंच क्रं 1 लव्हरे यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे बरोबर असल्याची खात्री करुन पीएसआय रजपुत यांनी माझ्या वर नमुद केलेल्या कामाकरीता म्हणून माझ्याकडे 25,000/- रुपये लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम घेवुन येण्यास सांगितल्याने आम्ही सर्वानुमते त्यांचे विरुध्द 25000/- रुपये लाचेची सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. त्यांनतर पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांनी मला पीएसआय रजपुत यांना देण्यासाठी लाचेची रक्कम हजर करणे बाबत कळविले असता मी माझेकडील 500/-रुपये दराच्या 50 भारतीय चलनी नोटा असे एकुण 25000/-रुपये समक्ष हजर केले. त्यावेळी पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांनी मला व पंचाना अॅन्थ्रासीन पावडरचा वापर, गुणधर्म याबाबत माहिती व प्रात्यक्षीक करुन दाखविले. मी हजर केलेल्या नोटांना पोकॉ/1759 कोंडरे यांनी अॅन्थ्रासीन पावडर लावुन माझ्या अंगातील पँटच्या समोरील उजव्या बाजुच्या खिषामध्ये ठेवली. लाचेची रक्कम दिल्यानंतर खिषातील रूमालाने आपला चेहरा पुसण्याबाबतचा सुनियोजीत ईषारा म्हणुन सांगण्यात आला. पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांनी मला, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना पुढील सापळा कार्यवाही बाबत पुन्हा सुचना दिल्या. पीएसआय रजपुत यांची भेट घेण्यास जाणेपुर्वीे ते कोठे आहेत याबाबत खात्री करण्याकरीता मी माझ्या फोनवरून त्यांचे फोनवर फोन केला असता ते कोर्टात आहेत. थोडया वेळात फोन करतो असे म्हणाल्याने आम्ही सर्वजण त्यांच्या फोनची वाट पाहत थांबुन राहिलो. परंतु बराच वेळ होवून गेल्यानंतरही पीएसआय रजपुत यांचा फोन न आल्यामुळे सापळा पथकातील सर्वानुमते पुन्हा तक्रारदार यांनी पीएसआय रजपुत यांना फोन करून भेटण्यासाठी कोठे यावे याबाबत विचारणा करण्यासाठी फोन केला असता त्यांनी एआयडीसी पोलीस ठाणे येथे भेटण्यासाठी बोलावले होते. त्यांनतर पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांच्या सुचनेनुसार पोलीस कर्मचारी जाधव यांनी 14ः17 वा. व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या गळ्यात आडकावुन दिले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 लव्हरे असे एमआयडीसी पोलीस ठाणे येथे जावुन पीएसआय रजपुत यांची समक्ष भेट घेतली. सदर भेटीदरम्यान माझे कामाच्या अनुशंगाने समोरासमोर चर्चा केली. चर्चे दरम्यान पीएसआय रजपुत यांनी मला, आणला का गाडीचे पेपर ... यावर मी सोमवारी आणतो... असे सांगुन फक्त काय ती चकरा कमी करा... असे म्हणालो असता त्यावर पीएसआय रजपुत यांनी आधारकार्ड आरसी बुक आणि दोन फोटो घेवून ये.. असे म्हणाले त्यावर मी, ते केलो होतो सर... असे म्हणालो असता पीएसआय रजपुत म्हणाले की, फोन करतो तुला मला आज वेळ नाही आता... आज अर्जंट काम आहे... डॉक्युमेंट घेवून सोमवारी ये... असे म्हणून पीएसआय रजपुत यांनी मला सोमवारी येण्यास स्पश्टपणे सांगीतले म्हणून मी व पंच क्रं 1 लव्हरे असे एमआयडीसी पोलीस ठाण्यातुन निघून बाहेर बाजूस थांबविण्यात आलेल्या सापळा पथकाच्या वाहनाजवळ 14ः50 वाजताचे सुमारास गेलोे असता पोकॉ/1488 गजानन जाधव यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर घेवून बंद केले. माझेत व पीएसआय रजपुत यांचेत झालेले सदरचे संभाशण आम्ही सर्वांनी ऐकले. पीएसआय रजपुत यांनी माझेकडुन आजरोजी लाच रक्कम स्विकारली नसुन मला सोमवारी कागदपत्रे घेउन येण्यास सांगितले म्हणुन पुढील सापळा कारवाई सोमवारी दिनांक 19/05/2025 रोजी करण्याचे ठरविण्यात येउन पोलीस निरीक्षक

भास्कर पुल्ली यांनी मला व सापळा पथकातील सर्व सदस्यांना गोपनीयता राखणेबाबत सुचना दिल्या होत्या.दिनांक 19/05/2025 रोजी सकाळी 10.00 वा मी ला.प्र.वि कार्यालय लातुर येथे सापळा कारवाईच्या अनुशंगाने हजर झालो. तेथे पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली, व सापळा पथकातील सदस्य दोन पंचासह हजर होते. पुढील सापळा कारवाई करणेकरीता आम्ही सर्वजन खाजगी वाहनाने पोलीस स्टेषन एमआयडीसी येथील परिसरात पोहचून आडबाजूला वाहन थांबवून पोलीस निरीक्षक पुल्ली यांनी सर्वांना पुढील सापळा कार्यवाही बाबत योग्य त्या सुचना दिल्या. त्यांनतर पोलीस निरीक्षक पुल्ली यांच्या सुचनेनुसार पोकॉ/1488 गजानन जाधव यांनी 13.40 वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटन चालु करुन माझ्या गळयात आडकावुन मला पंच क्रमांक 1 लव्हरे यंाचेसह पोलीस स्टेषन एमआयडीसी येथे पीएसआय रजपुत यांची भेट घेण्याकरीता रवाना केले. पोलीस उपअधिक्षक बर्गे साहेब, पोलीस निरीक्षक पुल्ली, पंच क्रमांक 2 गोविंदपुरे व सापळा पथकातील सदस्य असेे सर्वजण त्यांचेवर लक्ष ठेवुन पोलीस स्टेषन एमआयडीसी चे आजु-बाजूस कोणाच्या नजरेस येणार नाही असे लाच स्विकृतीच्या ईषा-याची वाट पाहत थांबुन राहिेलेे. मी व पंच क्रं 1 लव्हरे असे पीएसआय रजपुत हे पोलीस स्टेषन एमआयडीसी येथे बसत असलेल्या ठिकाणी भेट घेण्याकरीता गेलो असता ते दिसून आले नाहीत. त्यामुळे मी माझे मोबाईल क्रमांक 9527882646 वरुन पीएसआय रजपुत यांचे मोबाइर्ल क्रमांक 9545934898 यावर 13ः53 वा. फोन करून म्हणालो की, सर आलो होतो इथ पोलीस स्टेषन ला... आधार कार्ड ती घेवून ... त्यावर पीएसआय रजपुत यांनी डाकुमेंट आणलास का सगळे... असे म्हणाले त्यावर मी म्हणालो की, आणलोकी सर डाकुमेंट सगळे... त्यावर पीएसआय रजपुत यांनी वेळ लागेल मला जरा बाहेर आहे तपासामध्ये... नाही... मला टाईम लागेल... पुढच्या सोमवारी ये... पुढच्या सोमवारी ये... असे म्हणून तुझ अधार कार्ड वॉट्सअॅप कर मला... डाकुमेंट वॉट्सअॅप कर... मला तीनी पन मी बघतो... असे म्हणुन पीएसआय रजपुत यांनी माझेकडुन आजरोजी लाच रक्कम स्विकारली नसुन मला पुढच्या सोमवारी येण्यास स्पश्टपणे सांगीतले म्हणून मी व पंच क्रं 1 लव्हरे असे एमआयडीसी पोलीस ठाण्यातुन निघून बाहेर बाजूस थांबविण्यात आलेल्या सापळा पथकाच्या वाहनाजवळ 14ः01 वाजताचे सुमारास गेलोे असता तेथे पोकॉ/1488 गजानन जाधव यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर घेवून बंद केले'' माझेत व पीएसआय रजपुत यांचेत झालेले सदरचे संभाशण आम्ही सर्वांनी ऐकले. पीएसआय रजपुत यांनी माझेकडुन आजरोजी लाच रक्कम स्विकारली नसुन मला पुढील सोमवारी येण्यास सांगितले म्हणुन पुढील सापळा कारवाई सोमवारी दिनांक 26/05/2025 रोजी करण्याचे ठरविण्यात येउन पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली यांनी मला व सापळा पथकातील सर्व सदस्यांना गोपनीयता राखणेबाबत सुचना दिल्या होत्या.त्यानुसार दिनांक 26/05/2025 रोजी सकाळी 10.00 वा मी ला.प्र.वि कार्यालय लातुर येथे सापळा कारवाईच्या अनुशंगाने हजर झालो. तेथे पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली, व सापळा पथकातील सदस्य दोन पंचासह हजर होते. पुढील सापळा कारवाई सुरू करण्यापुर्वी लोकसेवक रजपुत हे एमआयडीसी पोलीस ठाण्यात हजर आहेत अगर कसे? याबाबत तक्रारदार यांनी माहिती घेतली असता लोकसेवक रजपुत हे व्हिआयपी बंदोबस्त करीता नांदेड येथे गेल्याचे समजले. ते पुन्हा दिनांक 28/5/2025 रोजी कर्तव्यावर हजर होणार असलेबाबत माहीती मिळाल्याने सापळा कार्यवाही स्थगित करून पुढील सापळा कार्यवाही दिनांक 28/05/2025 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले होते. त्यावेळी पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली यांनी गोपनीयतेबाबत योग्य सुचना दिल्या होत्या.त्यानुसार दिनांक 28/05/2025 रोजी सकाळी 10.00 वा मी ला.प्र.वि कार्यालय लातुर येथे सापळा कारवाईच्या अनुशंगाने हजर झालो. तेथे पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली, व सापळा पथकातील सदस्य दोन पंचासह हजर होते. आम्ही सर्वजण एमआयडीसी पोलीस ठाणेच्य आडबाजुस जाउन थांबलो. तेथुन पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली यांचे सुचनेवरून पोकॉ/1488 गजानन जाधव यांनी 12.08 वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटन चालु करुन माझ्या गळयात आडकावुन मी व पंच क्रमांक 1 लव्हरे असे पोलीस स्टेषन एमआयडीसी येथे पीएसआय रजपुत यांची भेट घेण्याकरीता गेलो असता,तेथे पीएसआय रजपुत हजर नव्हते. त्यामुळे मी माझे मोबाईल क्रमांक 9527882646 वरून पीएसआय रजपुत यांचे मोबाइर्ल क्रमांक 9545934898 यावर 12.12 वा फोन केला असता त्यांचा मोबाईल फोन बंद होता त्यामुळे मी पोलीस ठाण्यातील इतर पोलीसंाकडे पीएसआय रजपुत यांचेबाबत विचारणा केली असता ते सुट्टीवर आहेत, ते कधी येतील हे माहीत नाही असे समजले. म्हणुन मी व पंच क्रं 1 लव्हरे असे सापळा पथक थांबलेल्या वाहनाजवळ परत आलो असता 12.16 वा. पोकॉ/1488 गजानन जाधव यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर घेवून बंद केले.त्यानंतर पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली यांनी माझेकडे विचारणा केली असता त्यावर मी दोन पंच व सापळा पथकासमक्ष सांगितले की, यापुर्वी मी दोन वेळेस पीसएसआय रजपुत यांना भेटण्याकरीता गेलो असता त्यांनी माझेकडुन लाच रक्कम न स्विकारता नंतर येणेबाबत सांगितले होते. आजदेखील ते पोलीस ठाण्यात हजर नसुन त्यांनी त्यांचा मोबाईल फोन बंद करून ठेवला आहे. यावरून पीएसआय रजपुत यांना माझेबाबत संषय आला असावा त्यामुळे ते मला भेटण्याचे टाळत आहेत असे मला वाटते. त्यामुळे ते भविश्यात माझेकडुन लाच रक्कम स्विकारतील

असे मला वाटत नाही. याबाबत माझी खात्री झाली आहे. एमआयडीसी पोलीस ठाणे येथे मी पीएसआय रजपुत यांचे बाबत अधिक माहिती घेतली असता त्यांचे पुर्ण नाव प्रषांतसिंह रघुनाथसिंह राजपुत पद पोलीस उपनिरीक्षक, नेमणुक एमआयडीसी पोलीस ठाणे,लातुर असे असल्याचे समजले. तरी यातील लोकसेवक प्रषांतसिंह रघुनाथसिंह राजपुत पद पोलीस उपनिरीक्षक, नेमणुक एमआयडीसी पोलीस ठाणे,लातुर यांनी माझेवर एमआयडीसी पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या गुन्हयात मी अटकपुर्व जामीनासाठी मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेल्या अटकपुर्व जामीन अर्जामध्ये माझे बाजुने हायकोर्टात रिपोर्ट देण्यासाठी, गुन्हयात मदत करण्यासाठी व हजेरी कमी करण्यासाठी माझेकडे दिनांक 15/05/2025 रोजी 12.27 वा एमआयडीसी पोलीस ठाणे येथे पंचासमक्ष 25,000/- रुपये लाचेची मागणी करून सदरची लाच रक्कम लगेच घेउन येण्यास सांगुन स्विकारण्याचे मान्य केले होते. परंतु त्यांना संषय आल्याने लाचेची रक्कम स्विकारण्याचे जाणीवपूर्वक टाळले आहे. म्हणुन माझी त्यांच्या विरुध्द लाच मागणीची कायदेषिर तक्रार आहे.मी वर नमुद प्रमाणे सांगितलेली तक्रार ही पोकॉ/1488 गजानन जाधव यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, लातूर येथे संगणकावर टंकलिखीत केली असुन त्याची प्रिंट काढल्यानंतर ती मी वाचुन पाहिली ती मी सांगितल्याप्रमाणे बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
sudhakar ram dedhe(I (Inspector)) / pobn83693 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पो.स्टे.एम.आय.डी.सी.लातूर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** sudhakar ram dedhe
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** pobn83693